Pune Police

# प्रेस नोट. दिनांक २६/१२/२०१७.

## पुणे शहरात घरफोडीचे गुन्हे करणारे दोन सराईत गुन्हेगार प्रॉपर्टी सेलकडून अटक.

---

पुणे शहरातील घरफोडयांना प्रतिबंध व्हावा व झालेल्या घरफोडया उघडकीस याव्यात याकरीता मा पोलीस आयुक्त सो पुणे शहर यांनी मार्गदर्शक सुचना देऊन त्याबाबत आराखडा तयार करुन जास्तीत जास्त घरफोडयातील आरोपी अटक करुन गुन्हयांना आळा बसावा.याकरीता गुन्हे शाखेतील सर्व शाखांना आदेश देण्यात आले होते. त्याप्रमाणे आदेशाची पूर्तता करीत असताना घरफोडी करणारा सराईत आरोपी राजेश राम पपूल ऊर्फ चोरराजा याला ताब्यात घेणेकामी गेल्या दिड महिन्यापासून मा.वरीष्ठांचे,मार्गदर्शनाखाली योजना तयार केली.व त्या योजनेची अंमलबजावणी करीत असताना दिनांक २५/१२/२०१७ रोजी प्रॉपर्टी सेल गुन्हे शाखा पुणे शहर येथे नेमणुकीस असलेले पो.ना.ब.नं.१५१२ यशवंत खंदारे व पो हवा २०४८ अनिल उसुलकर यांना १)राजेश राम पपूल ऊर्फ चोरराजा रा.बि.न.२०, म्हाडा कॉलनी, हडपसर, पुणे व २) गणेश मारुती काटेवाडे वय ३० रा.मेदनकरवाडी, चाकण, पुणे हे न्यू रोशनी हॉटेल येवलेवाडी कोंढवा बुद्रुक पुणे या ठिकाणी आलेले आहेत.अशी माहिती मिळाली.सदर माहिती त्यांनी तात्काळ पोलीस निरीक्षक श्री.एस.व्ही.शिंदे यांना सांगितली.पो नि शिंदे यांनी सदरची माहिती वरीष्ठ अधिका-यांना सांगून त्यांचे मार्गदर्शनानुसार ते त्यांच्या स्टाफसह स्वतः रवाना झाले.व वरील दोन्ही सराईत घरफोडी करणा-या गुन्हेगारांना न्यू रोशनी हॉटेल, येवलेवाडी, कोंढवा बुद्रुक, पुणे येथून ताब्यात घेऊन प्रॉपर्टी सेल गुन्हे शाखा पुणे शहर या कार्यालयात आणून त्यांचेकडे बारकाइने तपास केला असता सदर आरोपींनी पुणे शहर व परिसरात एकूण ५२ घरफोडी चे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यांनी केलेल्या घरफोडयामधील एकूण १६१ तोळे सोन्याचे दागिने किंमत रु.४५,०८,०००/-(पंचेचाळीस लाख आठ हजार रुपये.),रोख रक्कम रु२०,७४०/- ,रुपये ३०,०००/- इतक्या किंमतीचे मोबाईल व लॅपटॉप तसेच गुन्हयात वापरलेली दोन दुचाकी वाहने किंमत रु १,००,०००/- आणि घर फोडी करण्याचे साहित्य असा एकूण ४६,५८,७४०/-रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.अधिक तपास पो. नि. श्री.सतिश शिंदे प्रॉपर्टी सेल हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही श्रीमती रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर, श्री. रविंद्र कदम सहआयुक्त पुणे शहर, श्री. प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा,पुणे.,श्री सुधीर हिरेमठ पोलीस उप आयुक्त,पुणे, श्री पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त,गुन्हेशाखा,पुणे. श्री समीर शेख, सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सतीश शिंदे, प्रॉपर्टी सेल, गुन्हे शाखा,पुणे शहर पो उप निरी इजाज शिलेदार,पो हवा .अनिल उसुलकर, ,अमोल भोसले,पो.ना. यशवंत खंदारे दिनकर भुंजबळ,सपो फौ सुभाष कुंभार,दत्ता गरुड,पो हवा संजय जगताप,संजय सुर्वे संभाजी गायकवाड,अनिल शिंदे,निजाम तांबोळी,संजय ढोले. यांनी केलेली आहे.




पुणे शहर पोलीस